शाळा सुरु मात्र पालकांच्या चेहऱ्यावर चिंता

बदलापूरच्या आदर्श शाळेत कडेकोट पोलीस बंदोबस्त

बदलापूर : येथील आदर्श शाळेतील दोन लहान मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या विरुद्ध नागरिकांनी पुकारलेल्या आंदोलनामुळे धुमसत असलेले बदलापूर शहरातील वातावरण गुरुवारी शांत होते. शहरातील सर्व दुकाने, व्यापारी संकुले आणि शाळा नियमित स्वरूपात सुरू होत्या. मात्र आपल्या मुलांना शाळेत सोडणाऱ्या पालकांच्या चेहऱ्यावर चिंता कायम दिसून आली. तर कोणतेही घटना घडू नये म्हणून आदर्श शाळेसमोरील पोलीस बंदोबस्त कायम होता. बदलापूर शहरातील आदर्श विद्या प्रसारक मंडळाच्या शाळेत दोन लहान मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या निषेधार्थ मंगळवारी हजारो बदलापूरवासी रस्त्यावर उतरले आणि उग्र आंदोलन केले.

या आंदोलनाला आलेल्या हिंसक स्वरूपामुळे मंगळवारी शहरात मोठा तणाव निर्माण झाला होता, तर परिस्थिती सावरण्यासाठी लावलेल्या पोलीस बंदोबस्तामुळे शहराला पोलीस छावणीचे रूप आले होते. याचे पडसाद बुधवारीदेखील शहरात दिसून आले.

राज्यातील अनेक बड्या नेत्यांनी बदलापूर शहरात धाव घेत पोलीस ठाण्यात ठिय्या मांडला होता. तर कोणत्याही अफवा पसरू नये यासाठी संपूर्ण शहरातील इंटरनेट सेवा बंद ठेवण्यात आली होती. तर खबरदारीचा उपाय म्हणून शहरातील सर्व शाळा, दुकानेदेखील बंद होते. यामुळे शहरात तणावपूर्ण शांतता पसरली होती. तर गुरुवारी मात्र शहरातील जनजीवन पूर्वपदावर आल्याचे दिसून आले. सर्व दुकाने, व्यापारी संकुले, शाळा, महाविद्यालय सुरू झाली होती. यावेळी आपल्या लहान मुलांना शाळेत सोडण्यासाठी पालकांनी हजेरी लावली होती. शाळेत पाल्याला सोडण्यासाठी रिक्षा, बस यांची सुविधा असतानादेखील गुरुवारी मात्र पालकांनी स्वत: उपस्थित राहून आपल्या लहानग्यांना शाळेत सोडले.

> योजनेच्या जाहिरातीवर दोनशे कोटी रुपये खर्च करण्यात आले असले, तरी राज्यातील 'लाडकी बहीण' असुरक्षितच आहे'. बदलापूर, कोल्हापूर, सातारा, दौंड या भागांमध्ये महिला अत्याचाराच्या घटना घडल्यानंतरही गृह विभागाकडून अपेक्षित कारवाई केली गेली नाही.
>
> – **सुप्रिया सुळे**, खासदार, राष्ट्रवादी कॉंग्रेस

> शाळा सुरू झाल्या मात्र मुलीला शाळेत सोडताना सतत तिची चिंता होती. घडलेल्या घटनेमुळे मनात भीती निर्माण झाली आहे. तसेच गेले दोन दिवस शहरात झालेल्या उग्र आंदोलनामुळे पुन्हा काही विपरीत घटना तर नाही होणार ना? अशी सतत चिंता होती.
>
> – **पालक**, बदलापूर

अजित पवार यांना गृहखाते द्या

राज्याचे गृहखाते हे अजित पवार यांच्याकडे द्यावे. ते कडक स्वभावाचे आहेत, ते नीट पद्धतीने सांभाळू शकतील. कारण देवेंद्र फडणवीस हे सध्या निवडणुकीच्या तयारीत व्यस्त आहेत. आपल्या पदरात जास्त जागा पाडून घेण्याकडे त्यांचे जास्त लक्ष आहे. त्यामुळे त्यांना गृहखाते सांभाळता येत नाही, अशी टीकाशरद पवार गटाच्या प्रवक्त्या विद्या चव्हाण यांनी बदलापूर येथे केली.

अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर आणि वाहनांवर कारवाई

नवी मुंबई : नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नेरुळ विभागाअंतर्गत नेरुळ स्टेशन व सेक्टर-२० येथील गुडविल कॉर्नर येथे पदपथावर अनधिकृतरित्या व्यवसाय करणाऱ्या तसेच बेवारसपणे वाहन पार्किंग करणारे तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या पंधरा हातगाडी, तीन टेम्पो व एक रिक्षा इत्यादींवर सदर मोहिमेअंतर्गत अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्यांवर दि.२२/०८/२०२४ रोजी नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यालयातील केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक मार्फत पदपथावर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्यांवर दि.२२/०८/२०२४ रोजी हटविण्याची व सामान जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. जप्त केलेले सामान दि.२२/०८/२०२४ रोजी कोपरखैरणे क्षेपणभुमी येथे जमा करण्यात आलेले आहे.

सदर कारवाईसाठी अतिक्रमण विभागातील अधिकारी व कर्मचारी, तेरा मजूर, तीन टोईंग, तीन पिकअप, एक आयशेर, अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक उपस्थित होते. यापूढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

अडीच वर्षीय मुलीला चटके, संचालक अटकेत

ठाणे : बदलापूर येथील शाळेमध्ये दोन चिमुकल्यांवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना ताजी असतानाच, भिवंडी येथील अनाथ आश्रमात एका अडीच वर्षांच्या मुलीला चटके देण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात अनाथ आश्रमाचा संचालक दत्ता गायसमुद्रे याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

कल्याण : उपआयुक्त अतुल पाटील यांनी घेतला दैनंदिन स्वच्छतेचा आढावा

कल्याण : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त अतुल पाटील यांच्यामार्फत नुकताच स्वच्छताविषयक दैनंदिन आढावा घेतला. सदर भेटीदरम्यान प्रभागक्षेत्र स्तरावर कार्यरत स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांच्या दैनंदिन कार्यवाहीचा आढावा घेवून प्रभागात येणाऱ्या अडचणी/समस्यांचे निराकरण करणेकामी मार्गदर्शन केले. तसेच स्वच्छतेकामी आवश्यक त्या सूचना दिल्या. यादरम्यान, अस्वच्छता आढळून आल्याबाबत ३ स्वच्छता निरीक्षक यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. तसेच दैनंदिन स्वच्छता कामात दिरंगाई केल्याबद्दल ९ सफाई कामगारांनाही कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. तसेच विभागातील जे अधिकारी/कर्मचारी दैनंदिन कार्यवाही करताना टाळाटाळ अथवा हयगय करताना आढळून आल्यास संबंधितांवर तातडीने कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुंबईकरांना लुटण्याचा डाव उधळला

अदानी चे स्मार्ट वीज मीटर बसवण्यास बेस्टची स्थगिती

मुंबई : शिवसेना गटनेते मा आमदार अजय चौधरी पश्चिम महाराष्ट्र समन्वयक माजी पश्चिम, महाराष्ट्र समन्वयक दगडु दादा सकपाळ, बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत, माजी आमदार अरविंद नेरकर, बेस्टचे माजी अध्यक्ष अनिल कोकीळ, सरचिटणीस रंजन चौधरी, विभागप्रमुख संतोष शिंदे, प्रमोद शिंदे साहेब, महेश सावंत, विधानसभा संघटक गजानन पाटील यांनी दिनांक ०५/०८/२४ रोजी बेस्ट उपक्रमात नवीन विद्युत स्मार्ट मीटर विरोधात बैठक घेतली होती.सदर बैठकीत घेण्यात आलेल्या विषयानुसार यापुढे सरकारच्या निर्देशानुसार निवासी वीज ग्राहक वर्गास नवीन विद्युत स्मार्ट मीटर लावण्यात येणार नाही असे लेखी माहिती बेस्ट प्रशासनाकडून देण्यात आली असून मुद्दा क्रमांक.०८ मध्ये त्याचा खुलासा केला आहे.

नवी मुंबईतील स्वच्छताकर्मींनी घेतला नाटयप्रयोगाचा विशेष अनुभव

नवी मुंबई :'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध नविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात असताना या कामात स्वच्छताकर्मींचे महत्वाचे योगदान लक्षात घेऊन त्यांच्या सेवाभावी कामाप्रती आदरभाव व्यक्त करीत विष्णुदास भावे नाटयगृह येथे 'अंधे जहां के अंधे रास्ते' हा विशेष नाटयप्रयोग विष्णुदास भावे नाट्यगृहात खास स्वच्छताकर्मींसाठी आयोजित करण्यात आला होता. स्वच्छताकर्मींच्या जीवनानुभवावर आधारित हे नाटक बघताना उपस्थित स्वच्छताकर्मी भारावून गेले. अस्तित्व संस्था, ठाणे संचालित उन्मुक्त कलाविष्कार नाट्य समुहाच्या वतीने सादर करण्यात आलेले राज्य नाट्य स्पर्धेतील हे विजेते नाटक स्वच्छता मित्र व सफाईमित्र यांच्या जीवनपटाचा वेध घेणारे आहे.

मुख्यमंत्र्यांना खुले पत्र

शाळेत जाणाऱ्या प्रत्येक मुलीच्या सुरक्षेची हमी सरकारकडून घेतली पाहीजे : माजी आ. कपील पाटील

माजी आमदार कपील पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना खुले पत्र पाठवून शाळांमध्ये मुलीच्या सुरक्षेच्या मुद्यावर लक्ष वेधले आहे.त्यांनी पत्रात म्हटले आहे की

प्रति,
मा. मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य.

विषय : शाळा / कॉलेजमधील मुली, मुलांच्या सुरक्षेबाबत...

महोदय,

बदलापूरच्या रेल्वे प्लॅटफॉर्मवर एका ताईने मंत्री गिरीश महाजन यांना प्रश्न विचारला, ''या जागी तुमची मुलगी असती तर ?'' बदलापूरच्या घृणास्पद घटनेने संतप्त झालेल्या प्रत्येकाच्या मनात हाच प्रश्न असेल !

मुंबई हायकोर्टाच्या माननीय न्यायमूर्ती महोदया श्रीमती रेवती मोहिते ढेरे यांनी सुद्धा "If the school is not a safe place than what is the use of speaking about right to education" अशा शब्दात आपली नाराजी व्यक्त केली आहे. गिरीश महाजन गर्दीला सामोरे तरी गेले. पण बदलापूरच्या पोलिसांनी पीडित मुलीच्या गरोदर आईला १२ तास पोलिस स्टेशनमध्ये बसवून ठेवलं. दाद लागत नाही, न्याय मिळत नाही म्हणून बदलापूरकरांचा उद्रेक झाला.

राज्यात गेल्या पाच वर्षात स्त्रियांवरील अत्याचाराच्या २० हजार घटनांची नोंद झाली आहे. सरकारं बदलतात, सत्तेवर कोणीही येवो परिस्थिती बदलत नाही. म्हणून लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना आणि व्यवस्थेविरोधात चीड निर्माण झाली आहे.

अशा घटना घडू नयेत म्हणून शाळा व्यवस्थेने व पोलिस यंत्रणेने जे करायला हवं, जी संवेदनशीलता दाखवला हवी ते होत नाही, म्हणून लोक संतप्त आहेत.

शाळेत जाणारी प्रत्येक मुलगी आणि मुलगाही सुरक्षित राहिला पाहिजे यासाठी शिक्षणमंत्री काही गोष्टी आपण सहज करू शकतील. आपण काही पावलं उचलली आहेत. उउद्धत सारख्या उपाययोजना या घटना घडून गेल्यानंतर गुन्हेगार पकडण्यासाठी योग्य आहेत. पण अशा घटना घडूच नयेत आणि मुला, मुलींना निर्भयपणे वावरता यावं, यासाठीही काही उपाययोजना करणं आवश्यक आहे.

शिक्षक आमदार असताना मी मुंबई पोलिसांच्या मदतीने काही उपक्रम राबविले होते. पोलिसांची शाळेला भेट, मुलांसाठी हेल्पलाईन. तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी शिक्षक भारतीच्या कार्यक्रमात येऊन मुलांसाठी हेल्पलाईनची घोषणा केली होती. त्या धर्तीवर काही नव्याने गोष्टी करता येतील.

१) स्थानिक पोलिस स्टेशनमधील अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील शाळा / कॉलेजेस् यांना नियमित भेट देणे.
२) स्कूल बस / रिक्षा / टॅक्सी चालक, वाहक यांची नियमित तपासणी / चौकशी करणे.
३) पोलिस हेल्पलाईनचा नंबर ठळकपणे शाळा / कॉलेजमध्ये प्रत्येक वर्गात आणि स्वच्छतागृहात लावणे.
४) शाळा / कॉलेजमध्ये अडचणींच्या जागी पॅनिक बटणची व्यवस्था करणे. (शहरी भागात हे सहज शक्य आहे.)
५) प्रत्येक पोलिस स्टेशनला 'माझी बहीण सुरक्षित बहीण' या मथळ्याखाली स्त्रियांचे तक्रारीचे अधिकार, हेल्पलाईनचे नंबर आणि संबंधित अधिकाऱ्यांचे मोबाईल नंबर मोठ्या अक्षरात लिहणे.
६) कोणत्याही पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवून घेण्यास उशीर झाल्यास थेट कंट्रोल रूमचा नंबर उपलब्ध करून देणे.
७) शाळांमध्ये लहान मुली, मुलांसाठी इरव ढीेंलह आणि त्रेंस्र ढीेंलह बद्दल समुपदेशकांचे कार्यक्रम ठेवणे.
८) शाळा / कॉलेज व्यवस्थापनाने मुलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाय करणे.

कृपया याबाबत तातडीने आपण उचित कार्यवाही कराल, ही अपेक्षा. **धन्यवाद !**

आपला स्नेहांकित,
कपिल पाटील. असेही पाटील यांनी पत्रात म्हटले आहे.

ICICI Home Finance

नोंदणी कार्यालय: आयसीआयसीआय बँक टॉवर्स, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१. **कॉर्पोरेट ऑफिस:** आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५९, भारत **शाखा कार्यालय:** कार्यालय क्र. एफबी-७, एफबी-११७, एफबी-११८, एफबी-११९, १ ला मजला. हायलंड कॉर्पोरेट सेंटर, कापुरबावडी जंक्शन, माजिवडे ठाणे (प)-४००६०७ **शाखा कार्यालय:** कार्यालय क्र: १०५ ते १०७, आई बंगलो अपार्टमेंट, रामनगर, डोंबिवली पूर्व, ठाणे ४२१२०१ **शाखा कार्यालय:** २ रा मजला, कार्यालय २०४, जंक्शन ४०६, प्लॉट क्र.४०६/१बी, टक्का रोड, पनवेल पश्चिम ४१०२०६/ **शाखा कार्यालय:** शुभजीवन अर्केड, कार्यालय क्र. ए-४०२, ४ था मजला, एस. व्ही रोड, बोरिवली पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र ४०००९२ **शाखा कार्यालय:** विकास गलेक्सी, १ला मजला. शॉप क्र. १०३ आणि १०४, सानेवडी, रेल्वे स्टेशन रोड, बदलापूर (प), महाराष्ट्र ४२१५०३ **शाखा कार्यालय:** कार्यालय क्र.१०३/ए, १ला मजला, पारीख कमर्शियल सेंटर, प्रिमियम पार्क, आगाशी रोड, विरार (पश्चिम), जिल्हा, पालघर-४०१३०३, **शाखा कार्यालय:** १ला मजला, कार्यालय क्र. पीओ२/१४७, हार्मोनी प्लाझा, समोर.एसबीआय, बोईसर, जिल्हा-पालघर-४०१५०१ **शाखा कार्यालय:** १ला मजला, ए-१०१, बीएसईएल टेक पार्क, प्लॉट क्र. ३९/५ आणि ३९/५ए, समोर वाशी स्टेशन, सेक्टर ३०ए, वाशी, नवी मुंबई-४००७०३

[नियम ८(६) ची तरतूद पहा] स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ (६) सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

सूचना ह्याद्वारे सामान्य जनतेला आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार ह्यांना देण्यात येत आहे की सुरक्षित धनकोकडे गहाण ठेवण्यात आलेल्या खाली नमूद करण्यात आलेल्या स्थावर मालमत्ता ज्याचा ताबा आयसीआयसीआय होम फायनांस कंपनी लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे त्याची विक्री "जे आहे जेथे आहे", "जे आहे जसे आहे" आणि "जसे आहे तसे आहे" तत्वावर खाली सविस्तरपणे देण्यात आल्यानुसार करण्यात येणार आहे.

अनु. क्र.	कर्जदार / सह-कर्जदार / हमीदार/ कायदेशीर वारसाचे नाव कर्ज खाते क्र.	तर असल्यास ज्ञात बोज्यासह सुरक्षित मत्तेचा तपशील	थकीत रक्कम	राखीव मूल्य इसारा रक्कम ठेव	मालमत्ता पाहणीचा दिनांक आणि वेळ	लिलावाचा दिनांक आणि वेळ	लिलावा पूर्वी एक दिवस	सरफेसी स्थिती
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(एच)		(आय)
१	गणेश जयवंत सालवी (कर्जदार) रुपाली गणेश सालवी (सह-कर्जदार) एलएचथ्युएलएच००००१३२२२३६ आणि एलएचथ्युएलएच००००१३९०४७७	सदनिका क्र. ३०४ ३ रा मजला इमा क्र आयबी प्लॉट क्र २१ ३० ४३ कैलाश आय बी वेखंडे पार्क शहापुर ठाणे एस क्र १०२/१ शहापुर-४२१६०१	रु. १,०९९,२८८/- १७ ऑगस्ट, '२४	रु.१,०५५,७००/- रु. १०५,५७०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
२	कमलाकर वही माने (कर्जदार) अनीता कमलाकर माने (सह-कर्जदार) एलएचटीएनई००००१२९९६६२	सदनिका क्र.१०२, १ ला मजला, ए इमा, स्काय वर्डस रेजन्सी, शिल दिवा रोड, पडके पाडा, डावले दिवा पूर्व दिवा महाराष्ट्र ४००६१२	रु. ३,८८०,५९७/- १७ ऑगस्ट, '२४	रु.२,७०३,९१०/- रु. २७०,३९१/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
३	कमलाकर वही माने (कर्जदार) अनीता कमलाकर माने (सह-कर्जदार) एलएचटीएनई००००१२९९६६३	सदनिका क्र. १०३, १ ला मजला, ए इमा, स्काय वर्डस रेजन्सी, शिल दिवा रोड, पडके पाडा, डावले दिवा पूर्व दिवा महाराष्ट्र ४००६१२	रु. ४,१११,७५७/- १७ ऑगस्ट, '२४	रु.२,७४०,५००/- रु. २७४,०५०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
४	सचिन वसंत सावंत (कर्जदार) वसंत बाबाय सावंत (सह-कर्जदार) एलएचव्हीआरआर००००१२८८९५५	रूम १४, दुसरा मजला,अयोध्या कुटीर सीएचएस स, रामचंद्र नगर, मानपाडा रोड, हार्दिक हॉस्पिटलजवळ, डोंबिवली पूर्व, महाराष्ट्र-४२१२०१	रु. ३,९११,७६५/- १७ ऑगस्ट, '२४	रु.३,३१८,०००/- रु. ३३१,८००/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
५	सुभाष चंद रैना (कर्जदार) आशा सुभाष चिककर्णा (सह-कर्जदार) एलएचव्हीएसआय ००००१४९५९१३ आणि एलएचव्हीएसआय ००००१४९५२४२	सदनिका १०४ १ ला मजला इमारत क ७ वास्तुसिद्धी लँडमार्क निवासाईलोकी पनवेल ८८ २ १० २ पनवेल महाराष्ट्र ४१०२०७	रु. ३,७३१,५१९/- १७ ऑगस्ट, '२४	रु.१,९५८,०४०/- रु. १९५,८०४/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
६	हिरालाल रामलखन यादव (कर्जदार) सीमादेवी हिरालाल यादव (सह-कर्जदार) एलएचथ्युएलएच ००००१४७३४०९ आणि एलएचथ्युएलएच ००००१४७३४१०	सदनिका क ०२ तळमजला विंग बी रामभवन कालहेर भिवंडी जुना एसक्र १२१ १ पीटीए न्यू एसक्र १२१ १बी ठाणे महाराष्ट्र ४२१३०२	रु. १,२१७,२५५/- १७ ऑगस्ट, '२४	रु.२,११०,०००/- रु. २११,०००/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
७	ऋषिकेश हेमकांत गोसावी (कर्जदार) धनश्री ऋषिकेश गोसावी, प्रतिमा हेमंत गोसावी (सह-कर्जदार) एलएचएमयुएम०००००९०१६५३	२४ ६वा मजला आनंद सागर सीएचएस एकवीरा स्कूल चारकोप कांदिवली पश्चिम १ मुंबई- ४०००६७	रु. ३,९३०,५०४/- १७ ऑगस्ट, '२४	रु.७,६५४,५००/- रु. ७६५,४५०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
८	अख्तर यासीन मालसुरी (कर्जदार) राशिया प्रवीण (सह-कर्जदार) एलएचबीएडी००००१३५५०२४ आणि एलएचबीएडी००००१३५५०२५	३ सदनिका क्र ०३ तळमजला ए विंग गंगा अपार्ट हेंद्रेपाडा बदलापूर पश्चिम सर्वे क्र १० ४ पी ठाणे-४२१५०३ ठाणे महाराष्ट्र	रु. २,१५५,३८७/- १७ ऑगस्ट, '२४	रु.१,४४९,४८०/- रु. १४४,९४८/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
९	जगदीशकुमार एस मिश्रा (कर्जदार) संगीता जगदीश मिश्रा (सह-कर्जदार) एलएचव्हीओव्ही००००१३३९९१३ आणि एलएचव्हीओव्ही००००१३४०५६१ आणि एलएचव्हीओव्ही००००१३४१६३९	सदनिका क्र एफबी-०४, तळमजला, सूर्या पॅलेस सीएचएसएल, सर्वे क्र. २८४, हिस्सा. क्र.१, हिस्सा क्र.२, गाव नीलेमोरे, नालासोपारा पश्चिम, ठाणे-४०१२०३	रु. १,६५३,३७०/- १७ ऑगस्ट, '२४	रु.२,३३१,०००/- रु. २३३,१००/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
१०	विपिन सी सोनी (कर्जदार) पुष्पीलाल नाथलाल सोनी (सह-कर्जदार) एलएचएमयुएम ०००००८१६९८८	सदनिका क्र २०४ २ रा मजला, ए विंग, भैरव अपार्ट गाव पस्थळ, बोईसर पश्चिम एस क्र ६१/१/४/२ बोईसर-४०१५०४	रु. १६,१०,७७७/- १७ ऑगस्ट, '२४	रु.२,००३,४००/- रु. २००,३४०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
११	योगेश शांताराम जाध (कर्जदार) रागिनी योगेश जाध (सह-कर्जदार) एलएचएमयुएम ००००१२७७०७४	२१० २ रा मजला विंग ए/२ श्रीजी दर्शन तालुका अंबरनाथ जिल्हा ठाणे -४२१५०३	रु. १,४०३,५९४/- १७ ऑगस्ट, '२४	रु.१,४८७,७००/- रु. १४८,७७०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
१२	रेखा प्रकाश दुसेजा (कर्जदार) प्रकाश किशनचंद दुसेजा (सह-कर्जदार) एलएचटीएनई००००१२९३७९०	५०२५ वा मजला इमा क्र ३ हिस्सा क्र १२डी ४ डी लँडमार्क हाईट्स कैलाश कॉलनी अंबरनाथ पु ठाणे सर्वे क्र १३२ ठाणे-४२१५०१	रु. २,५२५,०८३/- १७ ऑगस्ट, '२४	रु.३,६१६,६५०/- रु. ३६१,६६५/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
१३	प्रफुल्ल पंढरीनाथ पाटील (कर्जदार) अभिजीत प्रफुल्ल पाटील नैना प्रफुल्ल पाटील (सह-कर्जदार) एलएचबी एडी००००१३६०८२१	५०३ ऑरचीड विंग एम कोडनेम गोल्डन ड्रीम डोंबिवली खोणी ठाणे एस क्र २७ ठाणे-४२१२०४	रु. २,५०१,३८४/- १७ ऑगस्ट, '२४	रु.२,५२०,६०३/- रु. २५२,०६०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
१४	विजयसिंग राजपूत (कर्जदार) हिना कुमार (सह-कर्जदार) एलएचएमएमआर ००००१३६८६०१	शॉप क्र १ तळमजला , श्रीहरी निसर्ग रेसिडन्सी हरी ओं नगर अभिषेक फ्लोरिडा खोपोली रोड सर्वे क्र ५९ हिस्सा क्र २ प्लॉट क्र २ गाव खोपले , नेरळ पूर्व नेरळ रायगड महाराष्ट्र ४१०१०१	रु. १,१४०,६७३/- १७ ऑगस्ट, '२४	रु.१,२२८,५००/- रु. १२२,८५०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
१५	अनिकेत ज्ञानसुखआनंद सोनावणे (कर्जदार) अभिनाश ज्ञानसुखआनंद सोनावणे, कविता अनिकेत सोनावणे, सुरेखा ज्ञानसुखआनंद सोनावणे (सह-कर्जदार) एलएचपीव्हीएल ००००१३८५५५३ आणि एलएचपीव्हीएल००००१३८५७४२	सदनिका क्र १०४ १ ला मजला भूमिक अपार्टमेंट ओंकारेश्वर जवळ सीएचएसएल गट क्र ३२/० गाव चोनकौर तालुका पनवेल रायगड एनर पनवेल-४१०२०६	रु. २,६६२,४०१/- १७ ऑगस्ट, '२४	रु.२,६९३,२५०/- रु. २६९,३२५/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
१६	एलीस पीटर अलमेडा (कर्जदार) कॅरोलाईन एलीस अलमेडा (सह-कर्जदार) एलएचव्हीएसआय ००००१४९६८०५ आणि एलएचव्हीएसआय ००००१४९६८१५ आणि एलएचव्हीएसआय००००१४१७७३	सदनिका क्र. १०२ ए विंग औदुंबर अपार्ट दत्त नगरी बदला हाऊसिंग सोसा ली एस क्र ७० एच क्र ११ दत्त नगरी खरवई रोड बदलापूर गाव पश्चिम ४२१५०३ बदलापूर पश्चिम १७० एच क्र १ २ ठाणे महाराष्ट्र ४२१५०३	रु. २,३८८,५८७/- १७ ऑगस्ट, '२४	रु.३,०३४,०००/- रु. ३०३,४००/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
१७	विनू टी गावली (कर्जदार) प्रफुल्ल विष्णु गावली (सह-कर्जदार) एलएचएमएनई००००१४८३११४ आणि एलएचएमएनई००००१४८३११७	डी/१०१ डी/१०१ १ ला मजला सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स-विंग ए सरपंच वैभवीस एमआयडीसी रोड १२७ पडघा एलए ठाणे महाराष्ट्र ४०१४०४	रु. २,९११,७८९/- १७ ऑगस्ट, '२४	रु.२,५५१,५००/- रु. २५५,१५०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
१८	सुदामा पांडे (कर्जदार) महिमा पांडे (सह-कर्जदार) एलएचथ्युएलएच १४६६८७५ आणि एलएचथ्युएलएच००००१४६६८७७	सदनिका क्र ३०२ ३ रा मजला विंग बी रामभवन पाईपलाईन लेन आणि रेती बंदर रोड १२१/१ बी ठाणे महाराष्ट्र ४२१३०२	रु. १,३८३,५५३/- १७ ऑगस्ट, '२४	रु.१,२११,५००/- रु. १२१,१५०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
१९	राजवी राधेश्याम सोनी (कर्जदार) श्यामश्री सोनी (सह-कर्जदार) एलएचएमवीपी००००१३१३६४२	६०४ विंग ए ६ वा मजला दिवा अंजीला एच क्र ३ सी गाव करडे खुर्द तालवणी पनवेल १४३ ३ सी पनवेल-४१०२०७ पनवेल महाराष्ट्र ४१०२०७	रु. ३४०५२१८८८३/- १७ ऑगस्ट, '२४	रु.१,८५४,१००/- रु. १८५,४१०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
२०	गणेश एस खानविलकर (कर्जदार) हेमलता गणेश खानविलकर (सह-कर्जदार) एलएचटीएनई००००१२८१९६१	सदनिका क्र. १०६ १ ला मजला ई विंग शिव उत्सव गैलेक्सि गार्डन समोर पसारे गाँव रोड वांगणी महाराष्ट्र-४१०२०१	रु. १,८६१,९२५/- १७ ऑगस्ट, '२४	रु.१,५४९,४४०/- रु. १५४,९४४/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
२१	लीजू वेर्झाना वर्धे (कर्जदार) वेर्झाना भीमा वर्धे (सह-कर्जदार) एलएचटीएनई००००११२६६८४	सदनिका क्र. १०४, १ ला मजला, ऑर्चिड पार्क, ममदापुर, पोस्ट दिलकाप कॉलेज रोड नेरळ प. रायगड सर्वे क्र. १६९ लोणावळा महाराष्ट्र ४१०४०१	रु. २,५११,२१०/- १७ ऑगस्ट,'२४	रु.१,६००,०००/- रु. १६०,०००/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
२२	अतुल बाबासाहेब जाधव (कर्जदार) एलएचटीएनई ००००१२८५११०	प्लॉट क्र. ५२४, विक्रांत इस्टेट, नवी, सर्वे क्र. २७, चोरवली गाव वकास नेरळ	रु. १,०५६,३१८/- १७ ऑगस्ट,'२४	रु.५९९,२६६/- रु. ५९,९२६/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
२३	अनिषा अलेक्स डिमेलो (कर्जदार) आनॉल्ड अलेक्स डिमेलो (सह-कर्जदार) एलएचएमयुएम ००००१२७७९१८	३६३, डिवाईन हाऊस बंगलो, दोन तलावाजवळ, गाव वाठार, एस. क्र. ६७ हिस्सा क्र. बी, विरार पश्चिम, ६७७ ठाणे	रु. १०,१०७,१०५/- १७ ऑगस्ट, '२४	रु.११,३४०,०००/- रु. १,१३४,०००/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
२४	अयेलाल काशिनाथ सहानी (कर्जदार) विजयंत के सहानी (सह-कर्जदार) एलएचपीव्हीएल००००१३१४०६६	१ ला मजला ए विंग, अन्वी हेरिटेज, एच एन ७ सीटीएस क्र. १६७७ शुभा बिल्डींग जवळ चिंचवली ३४ १०५ खोपोली, महाराष्ट्र ४१०२०३	रु. ३,०१५,६५७/- १७ ऑगस्ट, '२४	रु.१,६८८,४००/- रु. १६८,८४०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
२५	रघुनाथ तुकाराम कीर (कर्जदार) शारदा रघुनाथ कीर (सह-कर्जदार) एलएचपीएलजी ००००१२४८७२० आणि एलएचपीएलजी००००१२४८७२४	सदनिका क्र.३१०२ आचार्य, क्लासिक माहीम रोड, पालघर पश्चिम पालघर ठाणे महाराष्ट्र ४०१४०४	रु. ८०५,९८६/- १७ ऑगस्ट, '२४	रु.९४५,०००/- रु. ९४,५००/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
२६	रेणु प्रेमप्रकाश राय (कर्जदार) अंजली प्रेमप्रकाश राय (सह-कर्जदार) एलएचपीएलजी ००००१२४८७२० आणि एलएचपीएलजी००००१२४८७२४	सदनिका क्र. बी २०२ आचार्य क्लासिक माहीम रोड पालघर पश्चिम ठाणे महाराष्ट्र	रु. १,८८२,८७०/- १७ ऑगस्ट, '२४	रु.३,८१९,०००/- रु. ३८१,९००/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
२७	रेणु प्रेमप्रकाश राय (कर्जदार) अंजली प्रेमप्रकाश राय (सह-कर्जदार) एलएचपीएलजी ००००१२४८७२१ आणि एलएचपीएलजी००००१२४८७२२	सदनिका क्र. बी २०३ आचार्य क्लासिक माहीम रोड पालघर पश्चिम ठाणे महाराष्ट्र	रु. २,३७६,७२५/- १७ ऑगस्ट, '२४	रु.३,८१९,०००/- रु. ३८१,९००/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
२८	मोह. नौसाद मन्सुरी (कर्जदार) रोशन मोह. नौसाद मन्सुरी (सह-कर्जदार) एलएचव्हीएसएच ००००१४०४२०७	सदनिका क्र. बी २०३, २ रा मजला अविवा अपार्टमेंट कुलसी इस्टेट समोर ऑफ नेरळ बदलापूर रोड सर्वे क्र. १७३/२ गाव ममदापूर, कर्जत जवळ कर्जत ४०१२०१	रु. २,०५२,६५४/- १७ ऑगस्ट, '२४	रु.१,५०८,८५०/- रु. १५०,८८५/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
२९	अशफाक अहमद मौलीला खान (कर्जदार) नसीम खातून खान (सह-कर्जदार) एलएचपीव्हीएल ००००१४०४७८९	सदनिका क्र. ९०५ ९ वा मजला, प्राईम बालाजी हाईट्स बी विंग सर्वे क्र. १३९ हिसा क्र. २ गाव बदलापूर ता. अंबरनाथ ठाणे ४२१५०३	रु. २,९११,४७७/- १७ ऑगस्ट, '२४	रु.२,२२३,४५०/- रु. २२२,३४५/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
३०	प्रियांका अमित बनसोडे (कर्जदार) अमित मधुकर बनसोडे (सह-कर्जदार) एलएचपीव्हीएल००००१४८६०४२ आणि एलएचपीव्हीएल००००१४८६०४४	सदनिका क्र. ४१२, ४ था मजला डी विंग, दि ऑर्चिड गट क्र. ३७/२/२, ३९/२/२, ३७/३ मौजे वायगे पनवेल महाराष्ट्र	रु. २१,२१,८३१३/- १७ ऑगस्ट, '२४	रु. ११,८०,३१०/- रु. १,१८,५३१/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
३१	ज्ञानेश्वर बी बालसराफ (कर्जदार) रत्ना बालसराफ (सह-कर्जदार) एलएचव्हीओव्ही००००१३२३६८१ आणि एलएचव्हीओव्ही००००१३२३३५८	सदनिका क्र. १०२, १ ला मजला, ओम हेरिटेज हाऊस क्र. ७०१/०३ सेक्टर ११ प्लॉट क्र. X ७/८ गाव शाहबाज सीबीडी बेलापूर नवी मुंबई महाराष्ट्र ४००६१४	रु. ३५,३५,९८६/- १७ ऑगस्ट, '२४	रु. ३०,०२,४००/- रु. ३,००,२४०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
३२	ज्ञानेश्वर बी बालसराफ (कर्जदार) रत्ना बालसराफ (सह-कर्जदार) एलएचव्हीओव्ही००००१३२३३५९ आणि एलएचव्हीओव्ही००००१३२३३८८	सदनिका क्र. १०३, १ ला मजला, ओम हेरिटेज हाऊस क्र. ७०१/०३ सेक्टर ११ प्लॉट क्र. X ७/८ गाव शाहबाज सीबीडी बेलापूर नवी मुंबई महाराष्ट्र ४००६१४	रु. २७,८३,९९८/- १७ ऑगस्ट, '२४	रु. २३,४७,२००/- रु.२,३४,७२०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
३३	ज्ञानेश्वर बी बालसराफ (कर्जदार) रत्ना बालसराफ (सह-कर्जदार) एलएचव्हीओव्ही००००१३२३३६४ आणि एलएचव्हीओव्ही००००१३२३३६५	सदनिका क्र. १०४ आणि १०५, १ ला मजला, ओम हेरिटेज हाऊस क्र. ७०१/०३ सेक्टर ११ प्लॉट क्र. X ७/८ गाव शाहबाज सीबीडी बेलापूर नवी मुंबई महाराष्ट्र ४००६१४	रु. ५,५३१,६०७/- १७ ऑगस्ट, '२४	रु. ४,११६,०००/- रु. ४११,६००/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
३४	हितेश भगवानजी शाह (कर्जदार) सुधा हितेश शाह (सह-कर्जदार) एलएचएमयुएम ००००१३१२८९१	अपा. क्र. १०५, १ ला मजला, इमा. क्र. एनएल ४/८८ सिद्धिविनायक ओनर्स असोसिएशन सेक्टर ११ नेरुळ नवी मुंबई ४००७०६	रु. ३,१५७,७५८/- १७ ऑगस्ट, '२४	रु.२,७१७,२००/- रु.२७१,७२०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
३५	अतिश शंकर मिस्त्री (कर्जदार) कांचन सखाराम तडिकर (सह-कर्जदार) एलएचटीएनई ००००१२८०९७८	सदनिका क्र. १००८, १० वा मजला, ए विंग, पनवेलकर उत्सव फेज १ सर्वे क्र. १७० हिस्सा क्र. १/३ आणि १/४ गाव बदलापूर ता. अंबरनाथ जिल्हा ठाणे	रु. १,६२३,५५३/- १७ ऑगस्ट, '२४	रु.१,४४७,२००/- रु. १४४,७२०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
३६	सुनील अशोक मनसिंघानि (कर्जदार) सुरेखा निलेश भिसे (सहकर्जदार) एलएचपीव्हीएल ००००१३८६११२ आणि एलएचपीव्हीएल ००००१३८८३०	सदनिका क्र. ८०१ वा मजला बी विंग प्राईम बालाजी हाईट शिवाजी चौकाजवळ गाव अंबरनाथ बदलापूर ठाणे	रु. ३,०१२,५१६/- १७ ऑगस्ट, '२४	रु.२,२७७,०००/- रु. २२७,७००/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
३७	विजय बहादूर अवध नारायण यादव (कर्जदार) निर्मला वही यादव (सह-कर्जदार) एलएचवी आरआर००००१२८१२४७	सदनिका क्र. ४०५, ४ था मजला ए विंग इमा. १ सेक्टर ४ पालसनाथ नगरी उमरोली, उमरोली पूर्व पालघर महाराष्ट्र ४०१५०१	रु. ९७२,३९९/- १७ ऑगस्ट, '२४	रु.१,५१२,०००/- रु. १५१,२००/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
३८	मनीष रामप्रभु आवळते (कर्जदार) सोनाली मनीष आवळते (सह-कर्जदार) एलएचएमयुएम००००१२९५३३५	८०३ ८ वा मजला ए २ भूमी लोनस सब प्लॉट क्र ए कल्याण शील रोड ठाणे ५७	रु.४,०३०,८२८/- १७ ऑगस्ट, '२४	रु.३,०९९,१००/- रु. ३०९,९१०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
३९	सुनिता गौरांग पंची (कर्जदार) गौरांग हाडु पंची (सह-कर्जदार) एलएचएनएमयु००००१२९४८८१	सदनिका क्र. २०५, २ रा मजला, एव्हरग्रीन १ सेक्टर २० ऐरोली नवी मुंबई	रु. ४,५१०,०२३/- १७ ऑगस्ट, '२४	रु.५,४९७,५००/- रु. ५४९,७५०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
४०	सुरज सिंग रेधवा (कर्जदार) किरण सुरजसिंग रेधवा (सह-कर्जदार) एलएचव्हीओव्ही ००००१३२२०६	सदनिका ३०५ ३ रा मजला सहजीवन सीएचएसएल इमा. १ सीटीएस २५१ बी २५१ सी, एमएमआरडीए कॉलनी लिंक लाईन वाशी नाका आणिक चेंबूर पूर्व मुंबई महाराष्ट्र ४०००७४	रु. २,५४०,५५३/- १७ ऑगस्ट, '२४	रु.१,९४४,०००/- रु. १९४,४००/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
४१	संजय मच्छिंद्र भाणवसे (कर्जदार) शिवानी संजय भाणवसे (सह-कर्जदार) एलएचएमयुएम००००१२७२७४६	मधु कुसुम इमा पोस्ट खोपोली ता. खालापूर रायगड ४१०२०३ सदनिका क्र.५	रु. २,३७५,०४१/- १७ ऑगस्ट,'२४	रु.२,३२७,७६३/- रु. २३२,७७६/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
४२	कृष्ण दुन्दा जगताप (कर्जदार) जयश्री कृष्ण जगताप (सह-कर्जदार) एलएचटीएनई००००१२७२१६१	सदनिका क्र. ५०४ ५ वा मजला एफ विंग भागीरथी रेसिडन्सी सर्वे क्र. ५३ हिस्सा क्र १ आणि ११ पार्ट गाव कुळगाव ता. अंबरनाथ जिल्हा ठाणे	रु. २,५८६,२७२/- १७ ऑगस्ट, '२४	रु.२,८८७,४५०/- रु. २८८,७४५/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा
४३	मेहफूज समशाद खान (कर्जदार) सबिया मेहफूज खान (सह-कर्जदार) एलएचएनएमयु००००१२८८७१४	सदनिका क्र. १ ला मजला मानसी कॉम्प्लेक्स, सेक्टर ११ कोपरखैरणे नवी मुंबई महाराष्ट्र ४००७०९	रु. ६,५११,८१४/- १७ ऑगस्ट,'२४	रु.७,०३०,८००/- रु. ७०३,०८०/-	२३ सप्टें, '२४ स ११- दु ३	१ ऑक्टो, '२४ स दु २-दु ३	३० सप्टें, '२४	सांकेतिक ताबा

ऑनलाइन लिलाव आमच्या लिलाव एजन्सी श्रीराम ऑटोमॉल इंडिया लिमिटेडच्या वेबसाइटवर (URL Link- eauctions.samil.in) आयोजित केला जाईल. 30 सप्टेंबर,'24 पर्यंत 5.00 PM पूर्वी गहाणखत/सूचनेला पुढील व्याजासह एकूण थकबाकी भरण्याची शेवटची संधी दिली जाते अन्यथा या सुरक्षित मालमत्ता वरील वेळापत्रकानुसार विकल्या जातील.

संभाव्य बोलीदारांनी ३० सप्टेंबर २४ रोजी किंवा त्यापूर्वी लेखाच्या शीर्षस्थानी नमूद केलेल्या आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर बयाणा रक्कम ठेव (इठे) आरटीजीएस/ डिमांड ड्राफ्ट (डीडी) (संदर्भ रकाना ई) सादर करणे आवश्यक आहे. ३० सप्टे. २४ रोजी दुपारी ०४.०० वा. पूर्वी. संभाव्य बोलीदारांनी नोंदणी फॉर्म आणि बिड अटी व शर्तींची स्वाक्षरी केलेली प्रत देखील आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर ३० सप्टेंबर २४ रोजी किंवा त्यापूर्वी संध्याकाळी ०५.०० च्या आधी सबमिट करणे आवश्यक आहे. ठाणे, दिवा - मुंबई, मुंबई, रायगड, अंबरनाथ, पालघर, डोंबिवली - मुंबई येथे देय असलेल्या "आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि. - लिलाव" च्या नावे बयाणा जमा डिमांड ड्राफ्ट (डीडी) राष्ट्रीयकृत/शेड्युल्ड बँकेकडून असावा. नेरळ - रायगड, रायगड, विरार, खोपोली, शहापूर, नवी मुंबई

लिलावाच्या किंवा निविदा सादर करण्याच्या तपासणी, अटी आणि शर्तींबाबत पुढील कोणत्याही स्पष्टीकरणासाठी, कृपया आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेडशी ९९२०८०७३०० वर संपर्क साधा.

कोणतीही कारणे न देता कोणतीही किंवा सर्व बोली नाकारण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्याने राखून ठेवला आहे. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया https://www.icicihfc.com/ ला भेट द्या.

दिनांक: २४.०८.२०२४
ठिकाण: महाराष्ट्र

प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय होम फायनांस कंपनी लिमिटेड
सीआयएन: यू६५९२२एमएच१९९९पीएलसी१२०१०६